# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क. ३७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०१/०७/२०१६.

**१) मोटार सायकलच्या धडक, एक जखमी. :–**

दिनांक ३०/०६/०१६ रोजी १४.३० ते १५.०० वा. सपोनि. किसन मोतीराम खंडाते पोलीस नियत्रंण कक्ष भंडारा हे त्यांच्या मोटार सायकल क्र. एमएच ३१ एसडब्लु ०८३३ ने बैल बाजार कडुन भंडारा कडे येत असतांना समोरून येणा–या अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने व भरधाव वेगाने चालवुन मोटार सायकलला बैल बाजार कडे जाणा–या रोडवरील लहान पुलीया जवळ धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाला व अपघाताची सुचना न देता पळुन गेला. साक्षीदाराचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादंवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ३०/०६/०१६ रोजी १७.०० वा. दरम्यान काळी पीवळी गाडी क्र. एमएच ३५/२६९७ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन एनएच ६ रोड बस स्टॉप साकोली येथे समासार्वजनिक ठिकाणी आमरोडवर उभे करून येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांना अळथडा निर्माण करतांना मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादी पोना. खडसे पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पोस्टे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) झाडावरून खाली पडल्याने डोक्याला मार लागुन उपचारा दरम्यान मृत्यु. :–**

दिनांक १५/०६/०१६ रोजी ०६.०० वा. ते ०९.०० वा. दरम्यान नितीन सुरेश साठवने वय २६ वर्ष रा. मोहगाव देवी हा त्याच्या शेतावर काम करण्याकरिता गेला होता. तो शेतावरील झाडावर चढुन झाडाच्या फांदया तोडत असतांना झाडावरुन खाली पडला त्यामुळे त्याला डोक्याला मार लागला. त्याला उपचारा करिता सुअरटेक हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले होते परंतु उपचारा दरम्यान तो मरण पावला. पो.स्टे. धंतोली नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जा.फौ .चे कागदपत्र पो.स्टे. वरठी येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ अन्वये नबंरी मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोना. खोकले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.